सबसे 'तेज' ग्लोबल महातेज...!

# ग्लोबल महातेज

Postal Regd. No. JAL/443/2025-2027

https://epaper.globalmahatej.com/

RNI. NO. MAHBIL /25/A0192

वर्ष १ ले | अंक : ३१९ | मंगळवार, दि. ११ ऑगस्ट २०२६ | पाने : ४ | अमळनेर | किंमत : ३ रुपये | Email - globalmahatej@gmail.com

**रवि ज्वेलर्स**
सराफ बाजार, अमळनेर.
मो. ७०७४७४२१२१

**सोने-चांदी**
**आजचे भाव**
२४ सोने ९९.५०% : ₹ १४८०००
२२ Ct सोने ९१.६०% : ₹ १३७०००
१८ Ct सोने ७५.००% : ₹ ११४०००
शुद्ध चांदी ९९९% : ₹ २३४०/-
भाव प्रती १० ग्राम






श्री. दिनेश रेजा
अमळनेर



श्री. आशिष छाजेड
शिक्षक



श्री. धीरज अग्रवाल
अमळनेर

**गर्व से कहो स्वदेशी है हम...!**
**स्वदेशी ही खरिदेंगे हम...!!**

स्वातंत्र्यपूर्व संग्रामातील स्वदेशीची हाक आता पुन्हा देवू या. नवरात्रोत्सवात आपण आदिमाया आदिशक्तीचा जागर करतो त्याप्रमाणेच स्वदेशीचाही जागर करूया..! सच्च्या भारतीयांवर जेव्हा-जेव्हा परकीय आक्रमण होते तेंव्हा-तेंव्हा ते प्रचंड त्वेषाने पेटून उठतात...!! आता तीच वेळ येऊन ठेपली आहे...!!!
जय भारत...!
जय स्वदेशी...!!




अमळनेर : येथील बोरी नदीला ३० व ३१ जुलै २०२६ रोजी अतिवृष्टीमुळे महापूर आला. त्यामुळे अनेकांच्या घरांची अंघोळ घातली गेली. काही जण अजूनही स्वतःच्या अंघोळीसह संसारोपयोगी वस्तूंनाही अंघोळ घालत आहेत. मात्र बोरीमाईचे पात्र या अंघोळीपासून वंचित असल्याचे दिसत आहे. नदीपात्रात विस्तारलेले कचऱ्याचे ढीग अजूनही प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे जैसे थे पडून आहेत. अशा स्थितीत बोरीमाई आपलीही उत्तम प्रकारे अंघोळ घातली जावी हीच तर हाक प्रशासनाला देत नसेल ना? बघूयात पालिका प्रशासनाला केव्हा जाग येते...? (छायाचित्र : रजनीकांत पाटील)

# मशाल मोर्चातून केंद्र, राज्य सरकारविरोधात 'एल्गार'

## सुभाष चौकात नेताजींना अभिवादन, पाचकंदील चौकात क्रांती स्मारकाला पुष्पहार, डॉ. आंबेडकर चौकात सभेने समारोप



*अमळनेर : क्रांती दिनानिमित्त रविवार, दि. ९ ऑगस्ट रोजी सायंकाळी ७ वाजता विविध राजकीय व सामाजिक संघटनांच्या वतीने शहरातील तिरंगा चौकातून मशाली हातात घेत मोर्चास प्रारंभ होऊन सुभाष चौकात नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून त्यांना अभिवादनावेळी उपस्थित विविध मान्यवर.*

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : क्रांती दिनानिमित्त रविवार, दि. ९ ऑगस्ट रोजी सायंकाळी ७ वाजता विविध राजकीय व सामाजिक संघटनांच्या वतीने शहरात मशाल मोर्चा काढण्यात आला. तिरंगा चौकातून मशाली हातात घेत सुरू झालेला मोर्चा सुभाष चौक, पाचकंदील चौक मार्गे डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकात पोहोचला. यावेळी सरकारविरोधी घोषणांमुळे परिसर दणाणला.

सुभाष चौकात नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून त्यांना अभिवादन करण्यात आले. पाचकंदील चौकातील क्रांती स्मारकाला महिला पदाधिकाऱ्यांनी पुष्पहार अर्पण केला. त्यानंतर डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकात डॉ. आंबेडकर यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून मोर्चाचे रूपांतर सभेत झाले. सभेत महागाई, बेरोजगारी, पेपरफुटी, भ्रष्टाचार, शेतकरी-कष्टकरी व विद्यार्थी प्रश्न, महिलांवरील अन्याय, पिण्याच्या पाण्याची समस्या तसेच रस्ते व पायाभूत सुविधांच्या दुरवस्थेवर केंद्र व राज्य सरकारचा निषेध करण्यात आला.

अमळनेर तालुक्यातील अतिवृष्टीग्रस्तांना तत्काळ ५० हजार रुपयांची मदत, शहर व ग्रामीण भागातील नुकसानीचे त्वरित पंचनामे, स्वच्छता, पिण्याचे पाणी व

पान २ वर


# पालिकेत विजेचा अपव्यय; कर्मचारी नसताना पंखे, दिवे सुरूच!


## लंचटाईममध्ये अनेक खुर्च्या रिकाम्या; प्रतीक्षालय परिसरातही विनाकारण पंखे सुरू

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : नागरिकांकडील विविध करवसुलीतून चालणाऱ्या येथील पालिका कार्यालयात विजेचा अपव्यय होत असल्याचे चित्र सोमवार, दि. १० ऑगस्ट रोजी दुपारी दोनच्या सुमारास पाहावयास मिळाले. कार्यालयातील कर्मचारी लंचटाईममध्ये जेवणासाठी गेलेले असताना अनेक ठिकाणी खुर्च्या रिकाम्या होत्या. मात्र, त्या ठिकाणचे पंखे सुरूच असल्याचे निर्दर्शनास आले, तर काही ठिकाणी आतील दिवे व विविध विंगमधील पथदिवेही सुरू असल्याचे दिसून आले.

कार्यालयातील कर्मचारी काही काळासाठी बाहेर गेल्यानंतर वीज उपकरणे बंद करणे अपेक्षित असताना त्याकडे दुर्लक्ष होत असल्याचे या प्रकारातून दिसून येत आहे. विशेष म्हणजे कार्यालयाबाहेरील प्रतीक्षालयात रिकामा बाक व वरील पंखा मात्र सुरूच असल्याचे आढळले. बाकावर कोणीही बसलेले नसताना पंखा सुरूच ठेवण्यात आल्याने वीजवापराबाबत पालिका प्रशासनाची किती उदासीनता आहे, याचे





*अमळनेर : येथील पालिका कार्यालयात सोमवार, दि. १० ऑगस्ट रोजी दुपारी दोनच्या सुमारास लंचटाईममध्ये कर्मचारी जेवणासाठी गेले असताना पंखे, दिवे मात्र सर्रास सुरूच असल्याचे चित्र.* (छायाचित्रे : रजनीकांत पाटील)

चित्र समोर आले आहे.

एकीकडे शासनाकडून 'वीजबचत हीच वीजनिर्मिती' असा संदेश देत नागरिकांना अनावश्यक वीजवापर टाळण्याचे आवाहन केले जाते. दुसरीकडे पालिकेच्या कार्यालयातच अशाप्रकारे वीज वाया जात असल्याने प्रशासनाच्या कार्यपद्धतीबाबत प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. पालिकेचा वीजखर्च हा अखेर नागरिकांच्या कराच्या पैशातूनच भागविला जातो. त्यामुळे कार्यालयातील प्रत्येक विभागाने वीजबचतीबाबत जबाबदारीने वागणे गरजेचे आहे. कर्मचारी लंचटाईमवेळी किंवा अन्य कामांसाठी बाहेर जात असताना पंखे, दिवे, संगणक तसेच इतर विजेची उपकरणे बंद करण्याच्या सूचना देणे आवश्यक आहे. वीजबिलाचा अनावश्यक भार नागरिकांवर पडू नये, यासाठी पालिकेने 'वीज बचत' केवळ कागदावर न ठेवता प्रत्यक्ष कार्यालयातूनच त्याची सुरूवात करायला हवी, अशी अपेक्षा नागरिकांकडून व्यक्त होत आहे.

या प्रकाराची वरिष्ठ अधिकाऱ्यांनी दखल घेऊन कार्यालयातील वीज उपकरणांचा अनावश्यक वापर टाळण्यासाठी संबंधित कर्मचाऱ्यांना सूचना द्याव्यात, अशी मागणीही नागरिकांकडून होत आहे.

# पंढरपूरच्या श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिराच्या पुजाऱ्यांनी घेतले श्री मंगळग्रह देवांचे दर्शन

## मंदिरातील स्वच्छता, सेवाभाव आणि शिस्तबद्ध नियोजनाचे केले कौतुक

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : येथील अतिप्राचीन, अतिदुर्मिळ व अतिजागृत असलेल्या विश्वातील एकमेव श्री मंगळग्रह देवांच्या मंदिरास पंढरपूर येथील श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिराच्या पुजारी सौ. ऊर्मिलाताई अविनाश भाटे यांनी सोमवार, दि. १० ऑगस्ट रोजी आपल्या सहकाऱ्यांसह भेट देऊन श्री मंगळग्रह देवांचे दर्शन घेतले. यावेळी सौ. भाटे व त्यांच्या सहकाऱ्यांशी झालेल्या संवादात मंगळग्रह सेवा संस्थेचे डेटा मॅनेजर मनोहर तायडे यांनी श्री मंगळग्रह मंदिरासह परिसरातील विविध मंदिरांसंदर्भातील पूजा विधी, अभिषेक, हवनशांती पूजा तसेच संस्थेतर्फे राबविल्या जाणाऱ्या विविध सामाजिक उपक्रमांची सविस्तर माहिती दिली.

श्री मंगळग्रह मंदिर परिसरातील भक्तीमय वातावरण, स्वच्छता, विनम्रता, प्रशासन आणि भाविकांना दिल्या जाणाऱ्या सेवेचे सौ.भाटे व त्यांच्या सहकाऱ्यांनी यावेळी समाधान व्यक्त केले. मंदिरातील शिस्तबद्ध व्यवस्था आणि नियोजन पाहून मनस्वी आनंद झाल्याची भावना त्यांनी व्यक्त केली. यावेळी सौ. भाटे यांच्यासह सौ. प्रतिभाताई भाटे, सौ. प्रज्ञाताई पुजारी, कवी रमेश पाटील, अमळनेर येथील ह.भ.प. सौ. निर्मलाताई पाटील, हनुमंत गायकवाड आदी उपस्थित होते. या भेटीप्रसंगी कवी रमेश पाटील यांनी आपल्या 'ढुईका' या काव्यसंग्रहाची प्रत मंदिराचे डेटा मॅनेजर तायडे यांना भेट म्हणून दिली. या सदिच्छा भेटीमुळे पंढरपूर आणि अमळनेरच्या धार्मिक क्षेत्रातील स्नेहबंध अधिक दृढ झाल्याची भावना उपस्थितांकडून व्यक्त करण्यात आली.



*अमळनेर : पंढरपूर येथील श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिराच्या पुजारी सौ. ऊर्मिलाताई अविनाश भाटे यांनी सोमवार, दि. १० ऑगस्ट रोजी त्यांच्या सहकाऱ्यांसमवेत येथील श्री मंगळग्रह देवांच्या मंदिरास दर्शन घेतल्यानंतर त्यांचा सन्मान करताना मंगळग्रह सेवा संस्थेचे डेटा मॅनेजर मनोहर तायडे. शेजारी कवी रमेश पाटील.* (छायाचित्र : मयूर चौधरी)

## संपादकीय

# धर्मस्वातंत्र्याची कसोटी

लोकशाहीची खरी ताकद फक्त मतदानाच्या हक्कात नसते, तर ती प्रत्येक नागरिकाला आपल्या अंतरात्म्याच्या आवाजानुसार जगण्याचे स्वातंत्र्य देण्यात असते. विचार, श्रद्धा, उपासना आणि धर्म या प्रत्येकाच्या वैयक्तिक आयुष्याशी निगडीत बाबी आहेत. म्हणूनच भारतीय राज्यघटनेने प्रत्येकाला धर्म स्वीकारण्याचा, आचरण करण्याचा आणि आश्यक वाटल्यास धर्म बदलण्याचाही अधिकार बहाल केला आहे. मात्र, या स्वातंत्र्याचा अर्थ फसवणूक, दबाव, धमकी किंवा आमिषाच्या आधारे दुसऱ्याच्या श्रद्धेवर अतिक्रमण करण्याचा परवाना असा कधीच नव्हता. या दोन टोकांमधील समतोल राखण्याचे मोठे आव्हान आज राज्यकर्त्यांसमोर उभे आहे. महाराष्ट्राने बळजबरी, फसवणूक आणि आमिष दाखवून होणाऱ्या धर्मांतराला आळा घालण्यासाठी केलेल्या नव्या कायद्यामुळे हाच समतोल पुन्हा चर्चेच्या केंद्रस्थानी आला आहे. राष्ट्रपतींच्या मंजुरीनंतर या कायद्याला वैधानिक स्वरूप प्राप्त झाले असून, बळजबरीने, धमकावून किंवा फसवून धर्मांतर करणे हा अजामीनपात्र गुन्हा ठरला आहे. दोषीला सात वर्षांपर्यंतच्या कारावासाची आणि एक लाख रुपयांपर्यंत दंडाची तरतूद करण्यात आली आहे. अशा प्रकारचा कायदा करणारे महाराष्ट्र हे देशातील तेरावे राज्य ठरले आहे. यापूर्वी ओडिशा, मध्य प्रदेश, उत्तर प्रदेश, गुजरात, कर्नाटक, उत्तराखंड, हिमाचल प्रदेश, हरियाणा, झारखंड, छत्तीसगड आणि अन्य काही राज्यांनीही अशाच स्वरूपाचे कायदे केले आहेत. महाराष्ट्राच्या कायद्यात काही तरतुदी अधिक स्पष्ट आणि कठोर करण्यात आल्याचा दावा शासनाकडून केला जात असला, तरी त्याचवेळी या कायद्यामुळे घटनात्मक स्वातंत्र्यावर गदा येण्याची भीतीही व्यक्त केली जात आहे.

भारतीय समाजाचा इतिहास पाहिला, तर धर्मांतर ही नवीन घटना नाही. सामाजिक विषमता, अस्पृश्यता, आर्थिक शोषण, शिक्षणाचा अभाव किंवा मानवी प्रतिष्ठेच्या शोधातून अनेकांनी काळानुरूप धर्मपरिवर्तनाचा मार्ग स्वीकारला. काहींनी तो स्वेच्छेने स्वीकारला, तर काही प्रसंगी दबाव, आमिष किंवा फसवणुकीच्या घटनाही समोर आल्या. म्हणूनच स्वच्छ धर्मांतर आणि सक्तीचे धर्मांतर यांच्यातील रेषा स्पष्ट असणे आवश्यक आहे. कोणत्याही व्यक्तीची श्रद्धा विकत घेता येत नाही, तसेच ती धमकीने बदलता येत नाही. श्रद्धा ही अंतःकरणातून उमलणारी बाब आहे. ती कायद्याच्या भीतीने किंवा पैशाच्या प्रलोभनाने टिकतही नाही. नव्या कायद्यानुसार धर्मांतरापूर्वी साठ दिवसांची लेखी सूचना देणे बंधनकारक करण्यात आले आहे. त्यानंतर संबंधित प्राधिकरणाकडून हरकती मागविणे, पोलीस चौकशी करणे आणि धर्मांतरानंतर निश्चित मुदतीत त्याची नोंद करणे आवश्यक राहणार आहे. एवढेच नव्हे, तर आई-वडील, भाऊ-बहिणी तसेच रक्ताचे नातेवाईकही याबाबत तक्रार दाखल करू शकतील. पैसा, नोकरी, विवाहाचे आश्वासन, मोफत शिक्षण, भेटवस्तू किंवा चांगल्या जीवनमानाचे प्रलोभन यांना 'आमिष' म्हणून स्पष्टपणे परिभाषित करण्यात आले आहे. या तरतुदींचा उद्देश धर्मांतराच्या नावाखाली होणाऱ्या गैरप्रकारांना आळा घालणे हा असला, तरी प्रत्यक्ष अंमलबजावणीत त्यांचा वापर कसा होईल, हा अधिक महत्त्वाचा प्रश्न आहे. कारण प्रत्येक कायद्याचे मूल्य त्याच्या उद्देशात नसते. ते त्याच्या अंमलबजावणीत असते. कायद्याचा उपयोग संरक्षणासाठी जितका होऊ शकतो तितकाच त्याचा गैरवापर छळाचे साधन म्हणूनही होऊ शकतो.

जर एखाद्या व्यक्तीने पूर्ण स्वेच्छेने धर्मपरिवर्तनाचा निर्णय घेतला, तर त्याला दोन महिने आधी शासनाला कळविण्याची सक्ती करणे हे त्याच्या वैयक्तिक स्वातंत्र्यावर अतिक्रमण ठरू शकते, असा आक्षेप अनेक कायदेतज्ज्ञांनी घेतला आहे. धर्म ही व्यक्तीच्या अंतर्मनाशी सुसंगत आहे का, हा प्रश्नही उपस्थित होत आहे. भारतीय राज्यघटनेने दिलेला व्यक्तिस्वातंत्र्याचा अधिकार आणि सर्वोच्च न्यायालयाने मान्य केलेला गोपनीयतेचा मूलभूत हक्क या दोन्हींच्या कसोटीवर या तरतुंदींची परीक्षा होणार आहे. दुसरीकडे समाजात धर्मांतराच्या नावाखाली फसवणूक, आर्थिक प्रलोभने किंवा असत्याच्या आधारावर नव्हे. त्यामुळे सक्तीच्या धर्मांतराला प्रतिबंध घालणारा कायदा असणे चुकीचे ठरत नाही. मात्र, त्याचवेळी हा कायदा निष्पाप नागरिकांच्या स्वातंत्र्यावर गदा आणणारा किंवा विशिष्ट समाजघटकांविरुद्ध वापरला जाणारा ठरू नये, याची खबरदारी प्रशासन आणि न्यायव्यवस्थेवर असेल. लोकशाहीची खरी ओळख विरोधी मतांचा सन्मान करण्यात असते. कायदा हा समाजातील विश्वास वाढविणारा असावा, संशय वाढविणारा नव्हे. धर्मांतरासारख्या संवेदनशील विषयात राजकारणचाा रंग जितका गडद होईल तितका सामाजिक सलोखा धोक्यात येण्याची शक्यता असते. म्हणूनच या कायद्याची अंमलबजावणी करताना घटनात्मक मूल्ये, मानवी हक्क आणि नैसर्गिक न्याय यांचा समतोल राखणे अत्यावश्यक आहे. शेवटी प्रश्न धर्मांतराचा नाही. प्रश्न आहे तो धर्मस्वातंत्र्याच्या मर्यादा आणि व्यक्तिस्वातंत्र्याच्या संरक्षणाचा. श्रद्धेचा निर्णय न्यायालय, पोलीस किंवा प्रशासन घेत नाही. तो प्रत्येक व्यक्तीचे अंतःकरण घेत असते. त्यामुळे फसवणूक आणि बळजबरी रोखण्याइतकीच स्वेच्छेच्या निर्णयाची प्रतिष्ठाही जपली गेली पाहिजे. अन्यथा श्रद्धेचे रक्षण करण्यासाठी उभारलेली कायद्याची भिंत नकळत स्वातंत्र्यालाच कैद करणारी ठरू शकते. अशा वेळी कायद्याचे यश शिक्षेच्या कठोरतेत नव्हे, तर न्यायाच्या समतोल अंमलबजावणीतच मोजले जाईल.





*अमळनेर : येथील प्रताप महाविद्यालयातील सेवानिवृत्त प्राध्यापकांच्या स्नेहमेळाव्यात वयाची ८० वर्षे पूर्ण केलेले प्रा. र. रा. बहुगुणे व प्रा. प्रकाश धर्माधिकारी यांचा सन्मान करताना प्रा. एस. ए. पाटील. शेजारी निवृत्त प्राचार्य डॉ. एस. आर. चौधरी आदी. समोर उपस्थित सेवानिवृत्त प्राध्यापक व मान्यवर.*

# सेवानिवृत्त प्राध्यापकांच्या स्नेहमेळाव्याने जुन्या आठवणींना उजाळा

## प्रताप तत्त्वज्ञान केंद्रात आयोजन; श्रीमंत प्रतापशेठजी व दीदींच्या प्रतिमेस सामूहिक वंदन

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : येथील प्रताप महाविद्यालयातील सेवानिवृत्त प्राध्यापकांचा स्नेहमेळावा रविवार, दि. ९ ऑगस्ट रोजी प्रताप तत्त्वज्ञान केंद्रात उत्साहपूर्ण वातावरणात झाला. या मेळाव्यास कनिष्ठ व वरिष्ठ विभागातील तब्बल ५८ सेवानिवृत्त प्राध्यापकांची उपस्थिती होती. अनेक वर्षांनंतर प्राध्यापक मित्र एकत्र आल्याने जुन्या आठवणींना उजाळा मिळाला आणि संपूर्ण वातावरण भावनिक व आनंदमय झाले.

कृतज्ञता भावनेतून प्रताप महाविद्यालयाच्या दर्शनी भागातील श्रीमंत प्रतापशेठजी व दीदी यांच्या प्रतिमेस वंदन करून सर्व प्राध्यापकांनी एकत्रितपणे अभिवादन केले. त्यानंतर प्रताप तत्त्वज्ञान केंद्रात आगमन झाल्यावर उपस्थित प्राध्यापकांचे गुलाबपुष्प देऊन स्वागत करण्यात आले. कार्यक्रम पत्रिकेनुसार दोन सत्रांत चर्चासत्रे घेण्यात आली. यावेळी उपस्थित मान्यवरांनी आपल्या मनोगतातून प्रताप महाविद्यालयाशी असलेल्या जिव्हाळ्याच्या आठवणींना उजाळा दिला. अनेक वर्षांनंतर सहकारी प्राध्यापकांची भेट झाल्याने जुन्या आठवणींना उजाळा मिळाला.

यावेळी वयाची ८० वर्षे पूर्ण केलेले प्रा. र. रा. बहुगुणे आणि प्रा. प्रकाश धर्माधिकारी यांचा विशेष सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रा. एस. ए. पाटील यांच्या हस्ते तसेच अतिथी माजी प्राचार्य एस. आर. चौधरी यांच्या उपस्थितीत हा सत्कार करण्यात आला. स्नेहमेळाव्यानंतर सर्वांनी स्नेहभोजनाचा आस्वाद घेतला. मेळावा आयोजनात प्रा. डॉ. प्रभाकर जोशी, दिलीप भावसार, जयेश गुजराथी, सुधीर पाटील व ई. टी. चौधरी यांनी विशेष सहभाग घेतला. सतीश सोनार व प्रकाश अग्रवाल यांनी आभार मानले.

# 'राष्ट्रवादी'च्या जिल्हा उपाध्यक्षपदी मोहम्मद आरिफ भाया तेली

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**



अमळनेर : येथील सामाजिक कार्यकर्ते मोहम्मद आरिफ शफी भाया तेली यांची राष्ट्रवादी काँग्रेसच्या जळगाव जिल्हा उपाध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली. माजी मंत्री तथा आमदार अनिलदादा पाटील यांच्या शिफारशीवरून ही नियुक्ती करण्यात आली आहे. पक्षाचे जिल्हाध्यक्ष संजय पवार यांनी त्यांना नियुक्तीपत्र देऊन नवीन जबाबदारी सोपविली. मोहम्मद आरिफ भाया हे अमळनेर पालिकेचे माजी आरोग्य सभापती मोहम्मद शफी भाया तेली यांचे पुत्र आहेत. ते गेल्या अनेक वर्षांपासून सामाजिक, धार्मिक तसेच जनहिताच्या विविध उपक्रमांमध्ये सक्रिय असून, शहरात त्यांनी स्वतंत्र ओळख निर्माण केली आहे.

आरिफ भाया यांनी रजा-ए-मुस्तफा सोशल ग्रुपच्या अध्यक्षपदाची जबाबदारी सांभाळताना विविध सामाजिक उपक्रम राबविले आहेत. सध्या ते अमळनेर शहर ईदगाह मुस्लिम कब्रस्तान कमिटीचे संचालक म्हणूनही कार्यरत आहेत. त्यांच्या सामाजिक कार्याची दखल घेत राष्ट्रवादी काँग्रेसने त्यांच्यावर जिल्हा उपाध्यक्षपदाची महत्त्वपूर्ण जबाबदारी सोपविली आहे. या नियुक्तीबद्दल आमदार पाटील, जिल्हाध्यक्ष पवार, 'शविआ'च्या गटनेत्या सौ. जयश्रीताई पाटील, तालुकाध्यक्ष भगवत पाटील, शहराध्यक्ष चेतन राजपूत यांच्यासह पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते, मित्रपरिवार आणि विविध सामाजिक संघटनांच्या प्रतिनिधींनी आरिफ भाया यांचे अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या.

नवीन जबाबदारीबाबत मोहम्मद आरिफ भाया यांनी पक्ष संघटना अधिक मजबूत करण्यासोबतच जनतेच्या प्रश्नांना प्राधान्य देऊन पक्षाच्या विस्तारासाठी प्रामाणिकपणे व समर्पणाने कार्य करण्याचा निर्धार व्यक्त केला.



*अमळनेर : महाराष्ट्र शासनाच्या 'हरित महाराष्ट्र अभियान' तसेच जिल्हाधिकारी, जळगाव यांच्या सूचनेनुसार येथील पालिकेतर्फे सोमवार, दि. १० ऑगस्ट रोजी पिंपळे रोडवरील एस. टी. कॉलनी परिसरात वृक्षारोपण मोहीम राबविण्यात आली.*

# हरित अमळनेरच्या दिशेने आणखी एक पाऊल

## पालिकेतर्फे 'हरित महाराष्ट्र अभियान'अंतर्गत वृक्षारोपण; विद्यार्थ्यांसह नागरिकांचा उत्स्फूर्त सहभाग

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : महाराष्ट्र शासनाच्या 'हरित महाराष्ट्र अभियान' तसेच जिल्हाधिकारी, जळगाव यांच्या सूचनेनुसार येथील पालिकेतर्फे सोमवार, दि. १० ऑगस्ट रोजी पिंपळे रोडवरील एस. टी. कॉलनी परिसरात वृक्षारोपण मोहीम राबविण्यात आली. नगराध्यक्ष व मुख्याधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या या उपक्रमात अधिकारी, कर्मचारी, विद्यार्थी आणि नागरिकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.

एस. टी. कॉलनी परिसरातील ओपन स्पेसमध्ये विविध वृक्षांची लागवड करण्यात आली. यावेळी पालिकेचे स्वच्छता निरीक्षक संतोष जाधव, किरण कंडारे, संतोष माणिक, प्र.- मुकादम गौतम बिऱ्हाडे, शहर समन्वयक गणेश गढरी, अनंत संदानशीव, श्याम करंदीकर यांच्यासह सफाई कर्मचारी उपस्थित होते. महिला हौसिंग ट्रस्टचे पदाधिकारी, युनूस शेख, बाळकृष्ण जाधव, वसीम पठाण तसेच परिसरातील नागरिकांनीही वृक्षारोपणात सहभाग घेतला. विशेष म्हणजे पिंपळे रोड येथील उज्ज्वल फाऊंडेशन व स्वामी प्री-स्कूलच्या विद्यार्थ्यांनीही या मोहिमेत सहभागी होत पर्यावरण संवर्धनाचा संदेश दिला.

### शहर अधिक हिरवेगार करण्याचा संकल्प

**अमळनेर शहरात 'हरित महाराष्ट्र अभियान'अंतर्गत विविध ठिकाणी वृक्षारोपण मोहीम राबविण्यात येणार आहे. केवळ वृक्षलागवड न करता लावलेल्या रोपांचे संगोपन करण्यावरही भर देण्याची गरज व्यक्त करण्यात आली. नागरिकांनी या मोहिमेत मोठ्या संख्येने सहभागी होऊन वृक्षारोपण तसेच वृक्षसंवर्धनासाठी पुढाकार घ्यावा आणि अमळनेर शहर अधिक हरित, सुंदर व स्वच्छ बनविण्यास सहकार्य करावे, असे आवाहन पालिका प्रशासनातर्फे करण्यात आले.**

# यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ अभ्यास केंद्र संयोजकपदी प्रा. डॉ. निळे

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : येथील प्रताप महाविद्यालयातील यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ अभ्यास केंद्राच्या केंद्र संयोजकपदी प्रताप महाविद्यालयातील भूगोल विभागप्रमुख प्रा. डॉ. कैलास सुभाष निळे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. खानदेश शिक्षण मंडळाचे कार्याध्यक्ष नीरज अग्रवाल व इतर पदाधिकाऱ्यांच्या हस्ते प्रा. डॉ. निळे यांना नियुक्तीपत्र प्रदान करण्यात आले.

प्रा. डॉ. निळे हे गेल्या अनेक वर्षांपासून प्रताप महाविद्यालयात भूगोल विभागप्रमुख म्हणून कार्यरत आहेत. अध्यापनासोबतच त्यांनी विविध शैक्षणिक



उपक्रमांमध्ये महत्त्वाची भूमिका बजावली आहे. त्यांच्या या नवीन जबाबदारीबद्दल प्रताप महाविद्यालयाचे प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी व कर्मचारी वृंद यांनी त्यांचे अभिनंदन केले आहे. डॉ. निळे यांच्या नियुक्तीमुळे यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ अभ्यास केंद्राच्या कामकाजाला अधिक गती मिळेल, असा विश्वास व्यक्त करण्यात येत आहे.

# पाणी पिण्यापूर्वी कशी घ्याल काळजी?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

पाणी आपल्या जीवनासाठी आणि आरोग्यासाठी अति आवश्यक आहे. मात्र जे लोक कमी पाणी पितात त्यांना अनेक आजारांना सामोरे जावे लागण्याची शक्यता असते. त्यामुळे पाणी पिण्यापूर्वी काही गोष्टींकडे लक्ष द्यावे.

सकाळी लवकर उठून रिकाम्यापोटी क्षमतेनुसार १ ते २ ग्लास पाणी प्यावे. हे शरीरासाठी खूप फायदेशीर आहे. अर्धे पोट जेवणाने, एक चतुर्थांश भाग पाण्याने आणि उर्वरित २५ टक्के भाग हवेने भरलेला पाहिजे. जवळ-जवळ ७० टक्के आजार दूषित पाण्यामुळे होतात. जेवणाच्या अगोदर आणि जेवणानंतर १ ते २ घोटच पाणी प्यावे. जास्त पाणी प्याले तर जेवण पचण्यासाठी अडचणी निर्माण होऊ शकतात.

# मशाल मोर्चातून केंद्र, राज्य सरकारविरोधात 'एल्गार'

**पान १ वरून :** वैद्यकीय व्यवस्था उपलब्ध करून देण्याची मागणी करण्यात आली. शेतमालाला हमीभाव, शेतकऱ्यांना कर्जमाफीचा लाभ, पाडळसरे धरणासाठी दरवर्षी ५०० कोटी रुपयांचा निधी आणि पीक विमा योजनेतील पीक कापणी प्रयोगाचा निकष रद्द करण्याची मागणीही करण्यात आली. ईव्हीएमऐवजी बॅलेट पेपरवर मतदान घेण्याची मागणी आंदोलकांनी केली.

बी. के. सूर्यवंशी यांनी प्रास्ताविक केले. अ‍ॅड. शकील काझी, चंद्रशेखर भावसार, रियाज मौलाना, बन्सीलाल भागवत, प्रा. अशोक पवार, शिवराम पाटील, काँग्रेसच्या महिला आघाडीच्या तालुकाध्यक्षा सौ. सुलोचनाताई वाघ आणि माजी आमदार डॉ. बी. एस. पाटील यांनी महागाई, बेरोजगारी, शेतकरी, विद्यार्थी, महिला, पिण्याचे पाणी, पाडळसरे धरण व लोकशाहीच्या प्रश्नांवर मनोगत व्यक्त केले.

दरम्यान, मोर्चात महाविकास आघाडीसह मराठा सेवा संघ, मुस्लिम युथ सेवा फाऊंडेशन, संभाजी ब्रिगेड, भारत मुक्ती मोर्चा, एनएसयूआय, निवृत्त सेवा संघटना, पुरोगामी क्रांती दल, प्रहार संघटना आणि साने गुरुजी कर्मभूमी स्मारक प्रतिष्ठान यांच्यासह विविध संघटनांचे पदाधिकारी व कार्यकर्ते सहभागी झाले होते.

यावेळी उपनगराध्यक्ष प्रशांत निकम, गोकुळ बोरसे, सुरेश पिरन पाटील, सौ. योजनाताई पाटील, अ‍ॅड. सौ. तिलोत्तमाताई पाटील, प्रताप आबा पाटील, गजेंद्र साळुंखे, जाकीर शेख, नरेंद्र पाटील, लोटन अण्णा चौधरी, अरुण देशमुख, पंढरीनाथ बागूल, अ‍ॅड. कौस्तुभ पाटील, मकसूद पठाण, प्रा. लीलाधर पाटील, चिंधू वानखेडे, योगेश पाटील, गौतम मोरे, बाळासाहेब पाटील, नितीन निळे, अ‍ॅड. रज्जाक शेख, विजय मास्तर पाटील, वासू मामा पाटील, गोकुळ आबा पाटील, अ‍ॅड. गिरीश पाटील, राकेश पवार, सुनील पाटील, संतोष पाटील व प्रवीण पवार आदी उपस्थित होते. डी. एम. पाटील यांनी सूत्रसंचालन केले. श्याम पाटील यांनी आभार मानले. राष्ट्रगीताने सभेची सांगता झाली.

# रामराव पाटील यांचे निधन



अमळनेर : येथील इंदिरा गांधी शाळेसमोरील निकम हाईट्समधील रहिवासी रामराव श्रीधर पाटील (मालपूरकर, वय ७४) यांचे आज सोममवार, दि. १० ऑगस्ट रोजी वृद्धापकाळाने निधन झाले. रामराव पाटील हे माजी आमदार डॉ. बी. एस. पाटील यांचे लहान बंधू, तर सेवानिवृत्त नियोजन अधिकारी प्रतापराव पाटील यांचे लहान सासरे होत. त्यांच्यामागे पत्नी, दोन मुलगे, सुना व नातवंडे असा परिवार आहे. त्यांची अंत्ययात्रा मंगळवार, दि. ११ ऑगस्ट रोजी सकाळी १० वाजता राहत्या घरापासून निघेल.

# अमळनेरमध्ये १३ ऑगस्टला भव्य कावड यात्रा

## श्री वर्णेश्वर महादेव मंदिर संस्थानातर्फे भक्तांनी जळोद रस्त्यावर येण्याचे आवाहन

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : येथील श्री वर्णेश्वर महादेव मंदिर संस्थानातर्फे दरवर्षीच्या परंपरेप्रमाणे यंदाही श्रावणातील पहिल्या दिवशी अर्थात गुरुवार, दि. १३ ऑगस्ट २०२६ रोजी भव्य कावड यात्रेचे आयोजन केले आहे. श्री वर्णेश्वर महादेव मंदिर संस्थानाचे अध्यक्ष सुभाष चौधरी यांच्या संकल्पनेतून गेल्या १२ वर्षांपासून ही कावड यात्रा मोठ्या भक्तिभावाने साजरी केली जाते.

**हजारो शिवभक्त होणार सहभागी**

रढावण, सुंदरपट्टी, हेडावे, नंदगाव, तासखेडा, साने नगर, गांधली, अमळगाव तसेच अमळनेर शहरातील हजारोंच्या संख्येने शिवभक्त या कावड



यात्रेत उत्साहाने सहभागी होणार आहेत. सकाळी ९ वाजेपर्यंत दगडी दरवाजा व श्री वर्णेश्वर महादेव मंदिर संस्थानात सर्व शिवभक्तांनी एकत्रित यावे. तेथून वाहनाद्वारे जळोद येथील सूर्यकन्या तापी नदीपात्रात जाऊन सर्व शिवभक्त तपीमाईचे पूजन करून कावडमध्ये पवित्र जल भरतील. त्यानंतर वाद्यांच्या गजरात नाचत, गात आनंदाने अमळनेरच्या दिशेने प्रस्थान केले जाणार आहे. यात शहर व शहराबाहेरील शेकडो शिवभक्त कावड यात्रेला भेट देणार आहेत. श्रावणातील या पवित्र कावड यात्रेत पुण्य कमावण्यासाठी जास्तीत जास्त शिवभक्तांनी सहभागी व्हावे व भगवान महादेवांचा आशीर्वाद घ्यावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

ज्या भक्तांना चालता येत नसेल त्यांनी जळोद मार्गावर गुरुवार, दि. १३ ऑगस्ट २०२६ रोजी दुपारी १ ते २ या वेळेत शिवभक्तांना भेट द्यावी, असे आवाहन कावड यात्राप्रमुख शिवभक्त सुभाष पाटील, भिकन वाडीले, सुशील भोईटे यांनी केले आहे.

हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक व मालक श्री. आनंद डिगंबर महाले यांनी महातेज पब्लिकेशनसाठी अविष्कार ग्राफिक्स, प्लॉट नं. 17, रामचंद्र नगर, भुसावळ रोड, जळगाव (महाराष्ट्र) 425002 येथे छापून गट नं. 160, प्लॉट नं. 51/52, सुप्रभा अपार्टमेंट, मराठा मंगल कार्यालयाजवळ, पटवारी कॉलनी, अमळनेर, जि. जळगाव (महाराष्ट्र) 425401 येथे प्रसिद्ध केले. संपादक :- आनंद डिगंबर महाले (रजि नं. MAHBIL/25/A0192), कार्यकारी संपादक श्री. भरत रघुनाथ पाटील ( पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील.) या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यातून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक व कार्यकारी संपादक सहमत असतीलच असे नाही. महातेज पब्लिकेशन तथा ग्लोबल महातेज संबंधित कोणतेही वाद तथा खटले फक्त अमळनेर न्यायालयातच चालविले जातील. संपर्क : 7711004040, 7711004242, ई-मेल : globalmahatej@gmail.com





# कौन आयएएस मृणाल मीना, जिनके काम का हर कोई है फैन

## कलेक्टर हो तो ऐसा!

सक्सेस स्टोरी

ग्लोबल महातेज वृत्तसेवा



अगर दिल में जनता की सेवा का जज्बा हो, तो एक प्रशासनिक अधिकारी पूरे इलाके की सूरत और लोगों की सोच बदल सकता है। मध्य प्रदेश कैडर के २०१५ बैच के बहुचर्चित आईएएस अधिकारी मृणाल मीना इसका एक बेहतरीन उदाहरण हैं। मध्य प्रदेश सरकार ने प्रशासनिक फेरबदल के तहत बालाघाट जिला कलेक्टर के पद पर तैनात रहे मृणाल मीना का तबादला अब छतरपुर जिला कलेक्टर के पद पर कर दिया है।

बालाघाट में अपने लगभग एक साल के कार्यकाल के दौरान उन्होंने अपनी अनूठी कार्यशैली, सादगी और कड़े फैसलों से न केवल प्रशासनिक व्यवस्था को सुधारा, बल्कि आम जनता और खासकर दूर-दराज के आदिवासियों के दिलों में अपनी खास जगह बनाई।

### सुबह ४ बजे अस्पताल पहुंचे और बदल दी सूरत

आईएएस मृणाल मीना की सबसे चर्चित घटनाओं में से एक रही बालाघाट के जिला अस्पताल का औचक निरीक्षण। किसी को कानों-कान खबर हुए बिना वे तड़के सुबह ४ बजे ही जिला अस्पताल का जायजा लेने पहुंच गए थे।

वहां की अव्यवस्थाओं, डॉक्टरों की गैरमौजूदगी और साफ-सफाई में लापरवाही को देखकर उन्होंने तुरंत कड़ा संज्ञान लिया। उनके इस कदम का नतीजा यह हुआ कि कुछ ही समय में बालाघाट जिला अस्पताल की कायापलट हो गई। मरीजों को सही समय पर इलाज, साफ-सुथरे बिस्तर और बेहतर सुविधाएं मिलने लगीं। स्थानीय लोग उनकी इस जमीनी मुस्तैदी को देखकर कहने लगे - "कलेक्टर हो तो ऐसा!"

### नक्सल प्रभावित आदिवासी इलाकों में पहुंचाई रोशनी

बालाघाट मध्य प्रदेश का एक प्रमुख नक्सल प्रभावित जिला माना जाता है, जहां के दुर्गम जंगलों में बसे गांवों तक सरकारी सुविधाएं पहुंचना हमेशा से एक चुनौती रहा है। कलेक्टर के रूप में मृणाल मीना ने इन इलाकों को अपनी प्राथमिकता बनाया। वे खुद पैदल और कठिन रास्तों से होते हुए सुदूर आदिवासी बस्तियों तक पहुंचे।

सालों से अंधेरे और बुनियादी सुविधाओं से वंचित गांवों में बिजली, पक्की सड़कें और पीने के पानी जैसी सुविधाएं सुनिश्चित कराईं। आदिवासियों की समस्याओं को सीधे उन्हीं की जुबानी सुनकर उनका तुरंत समाधान किया।

### छात्रों और युवाओं के लिए प्रेरणादायक सफर

२०१५ बैच के आईएएस अधिकारी मृणाल मीना राजस्थान के रहने वाले हैं। उन्होंने हैदराबाद की एनएएलएसएआर यूनिवर्सिटी से कानून की पढ़ाई की है। २०१५ बैच के इस आयएएस अधिकारी ने यूपीएससी में १७४वीं रैंक हासिल की थी। उनकी इस कामयाबी और काम करने के तरीके से सिविल सर्विसेज (यूपीएससी) की तैयारी कर रहे देश भर के छात्रों को बड़ी प्रेरणा मिलती है। वे यह सिखाते हैं कि सिर्फ पद हासिल करना ही बड़ी बात नहीं है, बल्कि उस पद पर रहते हुए समाज के सबसे निचले पायदान पर खड़े व्यक्ति की मदद करना ही असली सफलता है।


### छतरपुर में नई जिम्मेदारियां संभालने को तैयार

बालाघाट से ट्रांसफर होकर आईएएस मृणाल मीना अब छतरपुर जिले के कलेक्टर का पदभार संभाल रहे हैं। उन्होंने बताया कि वे पदभार संभालने के तुरंत बाद जिले में चल रही सरकारी योजनाओं की समीक्षा करेंगे और शासन की कल्याणकारी योजनाओं का लाभ अंतिम व्यक्ति तक पहुंचाना उनकी सर्वोच्च प्राथमिकता रहेगी।

# सकाळी उठल्याबरोबर आधी आपण मोबाईल फोन का पाहतो?

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

डोपामाइन लूप्स (डोपामाइन लूप हे एक मज्जासंस्थेतील प्रतिसादाचे चक्र आहे, ज्यामध्ये बक्षिसाच्या अपेक्षेमुळे डोपामाइन नावाचे मेंदूतील रसायन स्त्रवते, जे प्रेरणा आणि इच्छेशी संबंधित आहे), फोमो (काहीतरी महत्त्वाचे हुकण्याची भीती) आणि सवय यामुळे आपण सकाळी उठल्याबरोबर फोन तपासतो.



### डोपामाइन लूप्स

मोबाईलचे नोटिफिकेशन्स तपासल्याने मेंदूला आनंदाची आणि समाधानाची त्वरित भावना मिळते. तसेच असे वारंवार करत राहील्यामुळे आपल्याला एक सवय लागते. जाणीवपूर्वक विचार न करता आपण एखादी कृती पुन्हा-पुन्हा करतो.

### काहीतरी हुकण्याची भीती

झोपेत असताना काही महत्त्वाच्या बातम्या, संदेश किंवा अपडेट्स आपल्याकडून राहून गेले असतील, अशी चिंता आपल्याला वाटते म्हणून आपण उठल्यावर पहिला फोन पाहतो.

### सामाजिक संपर्क

नेहमी कनेक्शनमध्ये राहण्यासाठी फोन प्रत्येक क्षणी जवळ हवा असतो. संदेश त्वरित वाचल्याने मित्र आणि कुटुंबाशी जवळीक साधल्यासारखे वाटते.

### मेंदूला चालना मिळते

वेगाने स्क्रोलिंग फोटो, व्हिडिओ यामुळे आणि कथांमुळे झोपलेल्या मेंदूला जागृत होण्यास मदत होते. मोबाईलवर येणारे अलर्टस् पाहिल्याने जगात काय चालले आहे, हे माहिती नसल्यामुळे निर्माण होणारा तणाव कमी होतो.

### कामाचा ताण

सकाळीच ई-मेल तपासल्याने बॉसचा एखादा संदेश हुकण्याची चिंता राहत नाही. तसेच मोबाईलवर तारीख, वार आणि वेळ पाहताच कामांची आठवण होते.

### सकाळचे घड्याळ

फोनच तुमचा अलार्म म्हणून काम करतो. त्यामुळे दिवसाची सुरुवात करताना तो उपकरण थेट तुमच्या हातात येते. मोबाईलशिवाय एक सेकंदही राहणे आजकाल कठीण झाले आहे.

# भिजवलेले काळे मनुके का खावेत?

ग्लोबल महातेज वृत्तसेवा



काळे मनुके हे तुमच्या शरीरासाठी पोषक तत्वांनी परिपूर्ण आहे. दररोज तुम्ही जर भिजवलेले मनुके खाल्ले तर तुमच्या शरीराला फायदा होतो.

**महिलांसाठी फायदेशीर :** काळ्या मनुक्यामध्ये लोह आणि बी-कॉम्प्लेक्स जीवनसत्त्व भरपूर असतं. त्यामुळे लाल रक्तपेशी तयार करण्यासाठी मदत करते. किशोरवयीन महिलांसाठी हा परिपूर्ण आहार आहे.

**कोलेस्ट्रॉल कमी करण्यास मदत :** काळे मनुके वाईट कोलेस्ट्रॉल कमी करण्यासाठी मदत करते. तसंच रक्तदाब नियंत्रित ठेवण्यासाठी मदत सुद्धा करते. तयामुळे हार्ट अ‍ॅऑटक येण्याचा धोका कमी असतो.

हाडे मजबूत होण्यास मदत

**भिजवलेले काळे मनुके :** कॅल्शियम आणि बोरॉनचा नैसर्गिक स्त्रोत आहे. जे तुमचे हाडे मजबूत ठेवण्यासाठी मदत करते. सांधेदुखीच्या वेदनापासून आराम म्हणतो.

**रोगप्रतिकारक शक्ती :** काळ्या मनुक्यांमध्ये फ्लेव्होनॉइड्स आणि फिनोलिक संयुगे असतात. त्यामुळे जर तुम्ही भिजवलेले मनुके खाल्ले तर रोगप्रतिकारक शक्ती वाढते.

**त्वचा स्वच्छ :** काळ्या मनुक्यातील नैसर्गिक डिटॉक्सिफिकेशनमुळे त्वचा स्वच्छ होते. संपूर्ण शरीर अधिक जीवंत वाटते.

**दातांसाठी फायदेशीर :** भिजवलेले काळे मनुके खाल्ल्यास दात किडण्यापासून तसंच हिरड्यांच्या आजारापासून बचाव होते.

**वजन कमी होण्यास मदत :** काळ्या मनुक्यात भरपूर फायबर असते. जे तुमचे पोट भरल्यासारखे वाटू शकते. तसेच तुमची भूक नियंत्रित ठेवण्यास मदत करते. त्यामुळे वजन कमी होण्यास पण मदत होते.


...Khandesh Education Society's...

## Late Shri.P.C.Bhandarkar College of D.Pharmacy and Late Prof.R.K.Kele College of B.Pharmacy, Amalner.

Email :kespharm@reddiffmail.com

Contact No.: 02587-226489

(Affiliated to Dr. Babasaheb Ambedkar Technological University, Lonere)

Approved by Pharmacy Council of India, New Delhi Recognized by Govt. of Maharashtra

## WALK-IN-INTERVIEW

### Academic Year 2026-27

Applications are invited from eligible candidates for the following Non-Teaching posts.

| Sr. No. | Posts | Qualification | Total No. for Diploma and Degree |
|---|---|---|---|
| 01 | Laboratory Technician | D.Pharm | 5 |
| 02 | Laboratory Assistant or Laboratory Attenders | SSLC | 10 |
| 03 | Office Superintendent | Degree | 01 |
| 04 | Accountant | Degree | 01 |
| 05 | Store Keeper | D.Pharm / a Bachelor Degree recognized by a University or Institution | 1 |
| 06 | Computer Operator | BCA/Graduate with Computer Course | 1 |
| 07 | Office Staff I | Degree | 1 |
| 08 | Office Staff II | Degree | 1 |
| 09 | Peon | SSLC | 2 |
| 10 | Gardener | -- | 1 |
| | | Total | 24 |

### INTERVIEW DETAILS

| | |
|---|---|
| Date of Interview: | 24/08/2026 |
| Time: | 11:00 AM |
| Venue: | K.E.S's Late Shri.P.C.Bhandarkar College of D.Pharmacy and Late Prof.R.K.Kele College of B.Pharmacy, Amalner |

### INSTRUCTIONS

- All qualifications, experience and service conditions are as per PCI/DBATU/MSBTE/DTE/Government of Maharashtra norms.
- Candidates should bring their resume, original documents with one set of photocopies and a passport-size photograph.
- All appointments are on purely temporary/Non-Grant basis for the academic year 2026-27.

Shri. Niraj D. Agrawal, Chairman — Prof. Parag P. Patil, Secretary
Khandesh Education Society, Amalner

Shri. Yogesh M. Mundade, Chairman — Prof. Pritam B. Patil, Atg. Principal
Late Shri.P.C.Bhandarkar College of D.Pharmacy and Late Prof.R.K.Kele College of B.Pharmacy, Amalner



...Khandesh Education Society's...

## Late Shri.P.C.Bhandarkar College of D.Pharmacy and Late Prof.R.K.Kele College of B.Pharmacy, Amalner.

Email :kespharm@reddiffmail.com

Contact No.: 02587-226489

(Affiliated to Dr. Babasaheb Ambedkar Technological University, Lonere)

Approved by Pharmacy Council of India, New Delhi Recognized by Govt. of Maharashtra

## WALK-IN-INTERVIEW

### Academic Year 2026-27

1. Applications are invited from eligible candidates for the following posts for Diploma Course in Pharmacy

| Sr. No. | Lecturer | Total No. |
|---|---|---|
| 01 | M.Pharm/Pharm.D | 03 |
| 02 | B.Pharm with 3 years of professional experience | 04 |
| | Total | 07 |

2. Applications are invited from eligible candidates for the following posts for Bachelor of Pharmacy Course

| Sr. No. | Subject | Posts | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | Principal | Professor | Associate Professor | Assistant Professor | Librarian |
| | Qualification- | M.Pharm,Ph.D. | M.Pharm,Ph.D | M.Pharm | M.Pharm | B.Lib/M.Lib |
| 01 | Pharmaceutics | 01 | 01 | 01 | 02 | 01 |
| 02 | Pharmaceutical Chemistry (Including Pharm. Analysis) | | 01 | 01 | 03 | |
| 03 | Pharmacology | | 01 | 01 | 02 | |
| 04 | Pharmacognosy | | 01 | 01 | 01 | |
| 05 | Pharmacy Practice & related Subjects | | -- | 01 | 01 | |
| | | 01 | 04 | 05 | 09 | 01 |
| | Total | 20 | | | | |

Category-wiseseats reservation for Bachelor of Pharmacy Course-

i) Principal (01):OPEN(01)
ii) Professor (04):SC(01), DT/VJ(01), OBC(01), OPEN(01)
iii) Associate Professor (05):SC(01), DT/VJ(01), OBC(01), OPEN(02)
iv) Assistant Professor / Librarian (10):SC(01), ST(01), DT/VJ(01), OBC(02), OPEN(05)

### INTERVIEW DETAILS

| | |
|---|---|
| Date of Interview: | 24/08/2026 |
| Time: | 09:00 AM |
| Venue: | K.E.S's Late Shri.P.C.Bhandarkar College of D.Pharmacy and Late Prof.R.K.Kele College of B.Pharmacy, Amalner |

### INSTRUCTIONS

- All qualifications, experience and service conditions are as per PCI/DBATU/MSBTE/DTE/Government of Maharashtra norms.
- Candidates should bring their resume, original documents with one set of photocopies and a passport-size photograph.
- All appointments are on purely temporary/Non-Grant basis for the academic year 2026-27.

Shri. Niraj D. Agrawal, Chairman — Prof. Parag P. Patil, Secretary
Khandesh Education Society, Amalner

Shri. Yogesh M. Mundade, Chairman — Prof. Pritam B. Patil, Atg. Principal
Late Shri.P.C.Bhandarkar College of D.Pharmacy and Late Prof.R.K.Kele College of B.Pharmacy, Amalner



## मंगल पान




# लाल किताबानुसार मंगळ शुभ आणि अशुभ परिणाम कसे देतो?

## मंगळाला मजबूत करण्यासाठी काय कराल?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

मंगळाचे नाव घेतले तरी काही जण घाबरतात. कुंडलीत मंगळ असेल तर लग्न जमण्यात अडचणी येतात, अशी लोकांची समजूत आहे. मात्र, लाल किताबानुसार श्री मंगळग्रह हा शुभ आणि अशुभ असे दोन्ही परिणाम देतो. कुंडलीनुसार चांगला मंगळ आणि वाईट मंगळ व्यक्तीच्या पत्रिकेत असतात. शुभ मंगळ धैर्य, सन्मान, संपत्ती आणि यश देते, तर अशुभ मंगळ राग, वाद, अपघात आणि आयुष्यात संघर्ष निर्माण करतो. त्यामुळे श्री मंगळग्रहाबाबत लाल किताब काय सांगते ते जाणून घेऊ.

लाल किताबानुसार मंगळाची ऊर्जा अग्नीसारखी आहे. त्यामुळे पत्रिकेत जर मंगळ नियंत्रित आणि संतुलित असेल तर व्यक्तीला जीवनाला शक्ती, धैर्य आणि यश देतो; परंतु जर तो असंतुलित असेल तर तीच आग राग, संघर्ष आणि विनाश घडवून आणू शकते. त्यामुळे मंगळ हा दोन्ही प्रकारचे परिणाम देतो.




### मंगळाची इतर ग्रहांसोबतची स्थिती कसा परिणाम देते?

प्राचीन लाल किताबानुसार जेव्हा सूर्य आणि बुध जन्मकुंडलीमध्ये एकत्र असतात तेव्हा मंगळाला शुभता मिळते आणि जेव्हा सूर्य आणि शनी एकत्र असतात तेव्हा मंगळाला अशुभता येते. श्री मंगळग्रह हा बंधू-भगिनी, भांडणे, शारीरिक वेदना, रक्तस्त्राव इत्यादींचे प्रतीक आहे. तो व्यक्तीच्या आयुष्यात बॅडलक देखील आणतो. लाल किताबानुसार संपूर्ण शरीराची मध्यवर्ती नाभी असते तसेच मंगळाला देखील म्हटले जाते आणि जन्मकुंडलीतील नाभी चौथ्या घराचे प्रतिनिधित्व करते. येथून मंगळाचा चांगला आणि वाईट परिणाम व्यक्तीला मिळतो.

### मंगळ कशाचे प्रतिनिधित्व करतो?

जेव्हा मंगळावर अशुभता असते तेव्हा व्यक्ती आतून इतकी आक्रमक होते, की ती व्यक्ती कोणत्याही प्रकारे बदला घेण्यास तयार असते. शुभ मंगळ हा देवी, देवता आणि हनुमानजींचे प्रतिनिधित्व करतो, तर अशुभ मंगळ हा नकारात्मकता, वाईट शक्ती, असुर यांचे प्रतिनिधित्व करतो. मंगळाला घरात खाण्यासाठी, पिण्यासाठी, स्वयंपाकघरासाठी जागा देण्यात आली आहे. मंगळाची दिशा दक्षिण मानली जाते.

### अशुभ मंगळ काय परिणाम देतो?

अशुभ मंगळ असला की आई-वडिलांचा अपमान करणे, मोठ्या भावाशी वैर, निष्पाप लोकांना दुखावणे, हिंसा आणि अत्याचार, विश्वासघात, रागाने घेतलेले निर्णय, कौटुंबिक जबाबदाऱ्यांपासून दूर पळणे या कारणांमुळे श्री मंगळग्रह विशेषतः अशुभ मानला जातो. लाल किताबामध्ये कर्म आणि ग्रह यांच्यातील सखोल संबंधांचा विचार केला आहे. मंगळाला कुंडलीत सशक्त करायचे असल्यास दानधर्म, सत्कर्म, उपासना, पूजापाठ करून आपले कर्म सुधारणे आणि त्या ग्रहाशी संबंधित कर्तव्ये पार पाडणे हा ग्रहांना प्रसन्न करण्याचा सर्वोत्तम मार्ग आहे.

# दर ४१ वर्षांनी हनुमानजी कोणाला भेटायला येतात?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

पवनपुत्र हनुमानजींबद्दल असे म्हटले जाते, की ते अमर आहेत. रामायण काळात जन्मलेले हनुमानजी शेकडो वर्षांनंतर महाभारत काळात जीवंत होते. असे म्हटले जाते, की महाभारत काळात ते पांडवांना भेटायला देखील आले होते. हनुमानजी अजूनही जीवंत आहेत आणि या पृथ्वीवर फिरत आहेत. कारण त्यांना अमर होण्याचे वरदान मिळाले आहे. असाही दावा केला जातो, की हनुमानजी दर ४१ वर्षांनी एका आदिवासी गटाला भेटायला येतात.

काही वर्षांपूर्वी सेतू या आध्यात्मिक संस्थेच्या हवाल्याने हा खळबळजनक खुलासा करण्यात आला आहे, की हनुमानजी दर ४१ वर्षांनी श्रीलंकेच्या जंगलात एका आदिवासी गटाला भेट देण्यासाठी येतात. हनुमानजी हे मातंग ऋषींचे शिष्य होते. असे म्हटले जाते, की हनुमानजींचा जन्म मातंग ऋषींच्या आश्रमात झाला होता. मातंग समाजाचे लोक अजूनही भारताच्या दक्षिणेकडील राज्यांमध्ये राहतात. त्यांचे पूर्वज मातंग ऋषी होते. दाव्याप्रमाणे श्रीलंकेच्या जंगलात राहणारा एक आदिवासी गट आहे जो बाहेरील जगापासून पूर्णपणे तुटलेला आहे. हा आदिवासी गट श्रीलंकेतील पिदुरू पर्वताच्या जंगलात राहतो. सेतू वेबसाइटचा दावा आहे, की २७ मे २०१४ रोजी हनुमानजींनी या आदिवासी गटासोबत शेवटचा दिवस घालवला. आता यानंतर २०५५ मध्ये हनुमानजी पुन्हा आपल्याला भेटायला येतील.

भगवान प्रभू श्रीरामचंद्रांच्या मृत्यूनंतर हनुमानजी अयोध्येहून परतले आणि दक्षिण भारतातील जंगलात राहू लागले. यानंतर ते श्रीलंकेला गेले. त्यावेळी जोपर्यंत हनुमानजी श्रीलंकेच्या जंगलात राहिले तोपर्यंत या आदिवासी गटातील लोक त्यांची सेवा करत होते. हनुमानजींनी या वंशाच्या लोकांना ब्रह्माचे ज्ञान दिले. आणि त्याने वचन दिले की तो दर ४१ वर्षांनी या जमातीच्या पिढ्यांना ब्रह्मज्ञान देण्यासाठी येईल.



# श्री मंगळग्रह मंदिरात कशामुळे लाखो भाविकांची गर्दी जमते?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

महाराष्ट्रातील जळगाव जिल्ह्यातील अमळनेर येथे श्री मंगळग्रह देवांचे प्राचीन मंदिर आहे. दररोज भाविकांची या मंदिरात रेलचेल असते. मात्र, मंगळवारी येथे विशेषत्वाने लाखो भाविकांची गर्दी असते. प्रत्येक वर्गातील आणि समाजातील लोक येथे येतात आणि श्री मंगळग्रह देवांसमोर आपली उपस्थिती दर्शवितात. अखेर या मंदिरात असे काय खास आहे की तुलनेने मंगळवारी येथे भाविकांची मोठ्या प्रमाणावर गर्दी असते.

अमळनेर येथील श्री मंगळग्रह देवांचे स्थान हे अतिप्राचीन अतिदुर्मिळ व अतिजागृत स्थान मानले जाते. हे भूमिपुत्र श्री मंगळग्रह देव यांचे स्वयंभू मूर्ती असलेले विश्वातील एकमात्र अतिशय सकारात्मक ऊर्जा देणारे मंदिर असल्याचे भाविकांचे मत आहे. येथे दर मंगळवारी लाखो भाविक दर्शनासाठी येतात. यासोबतच श्री मंगळग्रह देवांच्या शांतीसाठी येथे अभिषेक, हवनशांती पूजा केली जातो. जे मांगलिक आहेत किंवा ज्यांचे लग्न होत नाही त्यांच्यासाठी येथे श्री मंगळग्रह देवांची सामूहिक आणि विशेष पूजा आहे.

असे म्हटले जाते, की मंगळवारी येथे येऊन श्री मंगळग्रह देवांची हवन पूजेद्वारे शांती आणि अभिषेक केल्यास मंगळ दोषापासून मुक्ती मिळते आणि व्यक्ती सुखी वैवाहिक जीवन जगते. श्री मंगळग्रह देवांना युद्धदेवता मानले जात असल्यामुळे शेती, राजकारण, पोलीस, सैन्य या क्षेत्राशी संबंधित लोकही येथे गर्दी करतात, हे सुद्धा या ठिकाणचे वैशिष्ट्य आहे. शेतीचे कामही श्री मंगळग्रह देवांशी निगडीत असल्याने आपले काम सुरळीत चालावे म्हणून शेती करणारे म्हणजेच शेतकरीही येथे हजेरी लावतात.

श्री मंगळग्रह देव आरोग्याशी संबंधित समस्या देखील दूर करतात, म्हणून हजारो लोक रोग आणि कर्जापासून मुक्ती मिळविण्यासाठी येथे येतात. असे म्हणतात, की आपल्या शरीरात वाहणारे रक्त हे मंगळाचे प्रतीक आहे आणि जर रक्त खराब असेल तर अनेक प्रकारचे आजार उद्भवतात. अशा स्थितीत श्री मंगळग्रह देवांच्या कृपेने रोगांपासून मुक्ती मिळण्याचे आशीर्वाद मिळविण्यासाठी भाविक येथे येतात. तुम्हाला या ठिकाणाविषयी अधिक माहिती हवी असल्यास आमच्या वेबसाईट आणि यू-ट्यूब चॅनलला आवर्जून भेट द्या. या पवित्र ठिकाणी मंगळदोषापासून मुक्ती मिळण्याबाबत शास्त्रानुसार मान्यता असलेली संपूर्ण माहिती मिळेल.

# शोध श्रीगणेशांच्या रूपांचा...

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

प्रत्येक हिंदू म्हणविणाऱ्याच्या अंतःकरणात गणपती बाप्पांबद्दल पूज्यत्वभाव पूर्णपणे असतो. हे दैवत विघ्नांचे हनन करण्यास सर्वथैव समर्थ असल्यामुळे नित्यपूजेच्या पंचायतनांत त्यांचा समावेश झाला आहे. सर्व शुभाशुभ संस्कारांत गणेशपूजा ही प्रारंभी व्हावयाची. या देवतेची व्याप्ती नेपाळातील लौडी गणेशापासून रामेश्वर येथील गणेशमूर्तीपर्यंत आढळते. याचे कारण शैव व वैष्णव या दोन्ही पंथांचे लोक या देवतेस भजत असून आपापल्या मताप्रमाणे कोणी त्यास शिवस्वरूप तर कोणी विष्णूस्वरूप समजतात. भारतात प्रत्येक गावात विघ्नहर्त्या गणपतींचे मंदिर असून कित्येक त्याला कुलदेव मानतात. तमिळनाडूत त्याला तुंबिकाई अलवर म्हणजे बुद्धिवान गजानन असे म्हणतात. तंजावर येथे गणपतींचे प्रसिद्ध देवालय आहे. त्रिचनापल्ली येथील उच्छी पिल्लेयर हे गणपतींचे देवालय अत्यंत भव्य व सुंदर आहे. अनेक संस्कृत व प्राकृत ग्रंथारंभी गणेशस्तवन केलेले आढळते. मराठीत गणेशप्रताप, गणेशलीलामृत, गणेशभागवत, गणेशपुराण, गणेशविजय वगैरे जुने ग्रंथ प्रसिद्ध असून, त्यांची श्लोकसंख्या दीड लाखाहून अधिक आहे.

### गाणपत्य पंथ

या देवतेच्या भक्तीचा जो निराळाच पंथ आहे तो गाणपत्य पंथ या नावाने संबोधला जातो. यासंबंधाची माहिती अशी आहे, की वेदांतील रुद्र हा मरुत् वगैरे अनेक गणांचा अधिपती असे मानण्यात येत असे. या गणांत रुद्राचेच गुण वास करीत असल्याचे मानून त्यांना देखील रुद्र असे म्हणत. या रुद्रांचा किंवा गणांचा एक नायक असे, त्याला गणपती हे नाव देण्यात आले होते. अथर्वशीर्ष उपनिषदांत अनेक देव व भूतांस रुद्र असे म्हटले आहे. यांपैकी 'विनायक' हे एकाचे नाव आहे. विनायक हे सर्व ठिकाणी असून मनुष्यमात्रांच्या कृत्यावर त्यांची नजर असते, असे महाभारतात (अनुशासनपर्व) सांगितले आहे. विनायक, गणेश्वर किंवा गणपती अनेक असल्याचा उल्लेख असून विनायकांची प्रार्थना केली असता ते संकटाचे निवारण करून कार्यसिद्धी करून देतात. यामुळे त्यांना सिद्धिविनायक हे नाव प्राप्त झाले. मानवगृह्यसूत्रांत चार विनायक असल्याचे सांगितले असून, त्यांचा संचार अंगात झाला असता स्त्री-पुरुषांच्या हातून विलक्षण कार्ये घडतात, असा उल्लेख आहे. त्यांचा कोप झाला असता मुले मृत्युमुखी पडतात व इतर प्रकारची हानी होते.



रुद्र व ब्रह्मदेव यांनी विनायकास गणांचा नायक नेमले. अंबिका ही विनायकांची माता असून तिलाही पूजा अर्पण करावी, असे याज्ञवल्क्याचे मत आहे. यावरून दिसून येईल की विनायक हे रुद्राप्रमाणेच भयानक परंतु प्रसन्न करून घेतल्यास हित करणारे आहेत, असे मानण्यात येत असे. गृह्यसूत्रे लिहिली गेली त्यावेळी चार विनायक असल्याचे समजत असत. स्मृतिकाली एकच विनायक आहे, असे ठरविण्यात येऊन त्यांची माता अंबिका आहे, असे मत बनले. विनायकांची कृत्ये, त्यांना देण्यात येणाऱ्या मत्स्यमांसादिक बलींचा प्रकार, हे सर्व पाहिले असता त्यांना भूतपिशाच्चादिकांचा नायक किंवा पुढारी समजत असत, हे सिद्ध होते.

पौराणिक काली गणपती-विनायक हे हिंदूंचे अत्यंत पूज्य देव झाले. ते विघ्नहर्ता आहेत याचदृष्टीने सर्व त्यांच्याकडे पाहू लागल्यामुळे कार्यारंभी त्यांचे चिंतन करणे हा सर्व शुभाशुभ कृत्यांतील एक अत्यावश्यक विधी होऊन बसला. ख्रिस्ती शकाच्या तिसऱ्या किंवा चौथ्या शतकापर्यंत गणपती-विनायकांची महती वाढली नव्हती व त्यानंतर त्यांची पूजा-अर्चा करण्याचा प्रघात पडला. जोधपूरच्या वायव्येस २२ मैलांवर घटियाला येथे विक्रम संवत् ९१८ (इ.स. ८६२) त बांधलेला एक स्तूप असून त्याच्या शिखरावर चोहोबाजूस चार विनायक खोदलेले आहेत. त्यावरील लेखांत विनायकांची प्रार्थना केलेली आढळते. कित्येक पुरातन लेण्यांत देखील गणपतींची मूर्ती खोदलेली आहे. यावरून असे म्हणता येईल, की सुमारे एक हजार वर्षांपूर्वीपासून गणपती विनायकांची उपासना करण्याची रूढी या देशात चालू झाली असावी.

### प्राचीन व अर्वाचीन इतिहास

गणपतींचा गजानन केव्हा व कसा झाला, याचा उलगडा होत नाही. पुराणांत त्याबद्दल कारण दिले आहे त्यावरून त्यांच्या धडावर गजतुंड बसविले असावे, हे संयुक्तिक दिसत नाही. रुद्र व त्यांची पत्नी ही गजचर्म पांघरीत असत. ज्या अरण्यात रुद्राचा व त्याच्या विनायक वगैरे गणांचा वास असे ते स्थान हत्तीसाठी प्रसिद्ध मानून वन्यपशूंत विशेष बुद्धिमान् जो हत्ती त्यांचे शिर विनायकास जोडण्याची क्लृप्ती पुराणकाली निघाली असावी.

शिवजींच्या अन्य गणांस देखील इतर प्राण्यांची (माकड, मांजर, सिंह) शिरे असल्याचे पुराणांवरून दिसून येते. या सर्व गणांत गणपतींना अत्यंत बुद्धिमान् व विद्वान असे मानतात. वेदात बृहस्पतीस अत्यंत ज्ञाता व बुद्धिशाली गणले असून त्यांना गणपती असे संबोधले आहे.

**गणनां त्वा गणपतिं हवामहे कविं कवीनामुपमश्रवस्तमम्।**
**ज्येष्ठराजं ब्रह्मणां ब्रह्मणस्पत आ नः शृण्वन्नूतिभिः सीद सादनम्।।**

**अर्थ :** 'समुदायांचे प्रभू म्हणून तुम्ही गणपती तुम्ही ज्ञानी जगात अत्यंत ज्ञानी, ज्यांची कीर्ती अतिशय उत्कृष्ट त्यांच्यामध्येही तुम्ही श्रेष्ठ, तुम्ही राजाधिराज, तुम्हाला आम्ही आदराने बोलावितो. हे सूक्तदेवते ब्रह्मणस्पते, आमची हाक ऐकून आपल्या सर्व शक्तींसह या आसनावर विराजमान हो.' याच सूक्ताने गणपतींचीही स्तुती केलेली आपण सध्या पाहतो. अर्थात् वेदकाली केवळ रूद्रांचा किंवा भूतपिशाच्चादिकांचा जो नायक म्हणून प्रसिद्ध होता, तोच पुराणे रचली गेली तेव्हा विघ्नहर्ता सिद्धिविनायक व विद्याधर बृहस्पती झाला हे वरील विवेचनावरून स्पष्ट होते. अथर्वदेवातील मुख्य मंत्र **ॐ गं गणपतये नमः** हा देखील हल्लींच्या गणपतीसंबंधाचा नाही, असे विद्वानांचे मत आहे. परंतु पाणिनीच्या पूर्वी तैत्तिरीयारण्यकाच्या सुमारास रचिलेल्या नारायणोपनिषदात गणपतीचा स्पष्टपणे उल्लेख आहे. यावरून गणेशभक्ती ख्रिस्ती शकाच्या आरंभी प्रचारात होती, असे ठरते.

**१) गाणपत्य**– या थात सहा भेद असल्याचे आनंदगिरीने शांकरदिग्विजयात सांगितले आहे. ते पुढीलप्रमाणे आहेत. महागणपतिपंथ– या पंथाचे लोक गणपती हेच जगत्कर्ता असून, त्यांनीच ब्रह्मदेवादि देव व एकंदर विश्व उत्पन्न केले, असे मानले जाते.

**२) हरिद्रा गणपती पंथ** – या पंथाचे लोक वर निर्दिष्ट केलेल्या सूक्तातील ब्रह्मणस्पती हेच गणपती, असे मानून तो सर्वांत श्रेष्ठ आहे, असे समजतात. गणपतींची मूर्ती, त्याचे यज्ञोपवीत, वस्त्रे वगैरे पिवळ्या रंगाची असावी. त्यांची सोंड व एकंदर यांच्या तप्तमुद्रा अंगावर धारण कराव्यात. तेच सर्वश्रेष्ठ आहेत, असे मानावे वगैरे या पंथाचे मत आहे. हा पंथ मध्वाचार्यांच्या वैष्णवपंथानंतर अस्तित्वात आला असावा किंवा मध्वाचार्यांनी तप्तमुद्राधारणासंबंधाने केलेल्या अनुज्ञांचा त्याच्यावर परिणाम झाला असला पाहिजे.

**३) उच्छिष्ट गणपती पंथ** – या पंथाचे लोक वाममार्गी शक्तांप्रमाणे निंद्य रीतीने त्याची भक्ती करतात.

**४) नवनीतगणपती पंथ. ५) स्वर्णगणपती पंथ. ६) संतान गणपती पंथ.**

या पंथांचे लोक आपण श्रुतीप्रमाणे गणपतींची पूजा करतो, असे सांगतात. गणपती हेच आदिकारण असून प्रत्येक शुभकार्याच्या आरंभी ते देवाधिदेव असल्यामुळे त्यांची पूजा करण्यात येते, असे ते प्रतिपादन करतात. या पंथाचे लोक महाराष्ट्रातही होते व सध्या आहेत. चिंचवड गावी सुमारे अडीचशे वर्षांपूर्वी श्रीमोरया देव, धरणीधर, गोसावीनंदन, निरंजन, चिंतामणि देव इत्यादी भक्त परम गाणपत्य होऊन गेले. थोरले माधवराव पेशवे हे देखील गणपतींचे उपासक होते. थेऊर येथील गणपतींची सेवा मनोभावाने करीत. पुण्याजवळ चिंचवड, कोकणातील पुळे व उत्तर कानडा जिल्ह्यांत इडगुंजी येथील गणपतींची देवालये जागृत असल्याबद्दल प्रसिद्धी आहे. प्रसिद्ध अष्टविनायकांची जी आठ पवित्र स्थाने ती देखील महाराष्ट्रातच आहेत. यावरून या प्रांतापुरते पाहिले गेल्यास एकेकाळी येथे गाणपत्य पंथाने लोकांच्या धर्मविचारांवर बराच पगडा बसवला होता, असे दिसते. ऐतिहासिकदृष्ट्या विचार करता असे म्हणण्यास हरकत नाही, की वेदकालापूर्वी सुरासुरांत (देव दैत्य) ज्या जंगी लढाया झाल्या त्यात गणपती हे तत्कालीन सेनानायक असावेत. कोणत्याही प्रकारची विघ्ने आली तरी आपल्या बुद्धिसामर्थ्याने त्यांचा परिहार करून व शत्रूंना पावलोपावली विघ्ने उपस्थित करून याने स्वपक्षाची सरशी होईल असे केले असावे, म्हणूनच याला विघ्नराज व विघ्नहर्ता ही दोन्ही नामाभिधाने प्राप्त झाली. कालेकरून गणपतींचे ऐतिहासिक अस्तित्व व त्याचे पराक्रम यांचे वर्णन लोकोत्तर प्रकारचे होऊन त्यांना धार्मिक स्वरूप व महत्त्व प्राप्त झाले.

### सध्या या दैवताची पूजा

विघ्नविनाशक मंगलमूर्ती : सध्या या दैवताची पूजा विघ्नविनाशक मंगलमूर्ती म्हणून केली जाते. तो सोळा विद्या व चौसष्ट कला यांही मंडित असल्याचे मानून त्यांच्या कृपाप्रसादाने सुबुद्धी व सुविधा यांचा लाभ होतो, असे आम्ही समजतो. कार्य लहान असो किंवा मोठे ते निश्चितपणे तडीस जाईल व त्यापासून इच्छित हेतू साध्य होईल हे सांगणे अशक्य असते. अटकळीबाहेर अदृष्ट अशा गोष्टी आयत्या वेळी कशा नडतील हे सांगणे बहुतेक शक्य नसल्यामुळे प्रत्येक कार्याच्या आरंभी विघ्नहर्त्या परमेश्वराची प्रार्थना करून त्यांच्या कृपाछत्राखाली कार्य करीत राहणे हा मनुष्यमात्राचा धर्म आहे. पुन्हा-पुन्हा विघ्ने उपस्थित होऊन आपला प्रगतीचा मार्ग ती खुंटवू लागली तरी न डगमगता ईश्वरभक्तीची अभेद्य ढाल घेऊन पुढे कूच करीत जाणे म्हणजे पुरुषार्थाची गुरुकिल्ली प्राप्त करून घेणे होय. हल्लीच्या काळी गणपतींसारखे गजतुंडधारी स्वरूप सच्चिदानंद स्वरूपाच्या कल्पनेशी जुळविणे अशक्य झाल्यामुळे ज्यांचे विचार प्रगल्भ झाले आहेत असे लोक चतुर्थीसारखा उत्सव हिंदुस्थानात साजरा होत असलेला पाहून किंचित नाक मुरडतात.

**(वरील माहिती विविध धर्मग्रंथ, समाजमाध्यमे अर्थात सोशल मीडियावरून संकलीत केली आहे.)**